मंत्री/मत्स्य वि.,बंदरे/व्ही.आय.पी./ २०२५ /जा.क्र. ४०

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**मत्स्यव्यवसाय व बंदरे**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
दिनांक : 29 JAN 2025

प्रति,

मा.ना.श्री.दादाजी भुसे
मंत्री, शालेय शिक्षण,
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई

**विषय :- राज्यातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारण्याबाबत.**

**महादेय,**

इयत्ता १० व १२ वी च्या परीक्षेस परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा देण्यास परवानगी, तसेच परीक्षेच्या वेळी आवश्यकता वाटल्यास प्रकरणपरत्वे तपासणीसाठी महिला पोलीस / अधिकारी किंवा शिक्षक कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी, असे शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

इयत्ता १० व १२ वी परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या परीक्षा आहे. यावर विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य अवलंबून आहे. सदर परीक्षा पारदर्शकपणे कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार जसे कॉपी मुक्त परीक्षा होणे अपेक्षित आहे. याकरीता शासनस्तरावरुन वेळोवेळी सुचना दिल्या जातात. जर, परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात आला तर, एखादी परीक्षार्थी बुरखा घालून ईलेक्ट्रॉनीक उपकराणाचा उपयोग करुन परीक्षा देत आहे किंवा नाही, हे तपासणे शक्य होत नाही. आकस्मिक प्रसंगी काही आक्षेप उदभवल्यास सामाजिक तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनेक विद्यार्थ्यांना नुकसान सहन करावे लागेल.

सबब, **राज्यातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारण्याकरीता** तातडीने कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन सर्व संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, ही विनंती.

आपला

**( नितेश नारायण राणे )**